# पशुसंवर्धन विभाग,
# जिल्हा परिषद, नाशिक.

# नाशिक जिल्हा परिषद, पशुसंवर्धन विभाग.

# विभागाची माहिती.

## नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत श्रेणी -1 चे 111 व श्रेणी -2 चे 133 असे एकुण 244 दवाखाने.

| | |
|---|---|
| आदिवासी क्षेत्रात :- | 102 पशुवैद्यकिय दवाखाने. |
| बिगर आदिवासी क्षेत्रात :- | 142 पशुवैद्यकिय दवाखाने. |

| पशुधन संख्या | |
|---|---|
| एकुण मोठी जनावरे :- | 1073710 (गाय/म्हैस/बैल) |
| एकुण लहान जनावरे :- | 846778 (शेळी/ मेंढी) |

| कार्यरत पदांची सद्यस्थिती | |
|---|---|
| पशुधन विकास अधिकारी | |
| मंजूर पदे | 126 |
| कार्यरत पदे | 106 |
| रिक्त पदे | 20 |

| कार्यरत पदांची सद्यस्थिती | |
|---|---|
| सहाय्यक पशुधन विकास अधिकारी | |
| मंजूर पदे | 39 |
| कार्यरत पदे | 39 |
| रिक्त पदे | 00 |

| कार्यरत पदांची सद्यस्थिती | |
|---|---|
| पशुधन पर्यवेक्षक | |
| मंजूर पदे | 136 |
| कार्यरत पदे | 94 |
| रिक्त पदे | 42 |

| कार्यरत पदांची सद्यस्थिती | |
|---|---|
| व्रणोपचारक | |
| मंजूर पदे | 99 |
| कार्यरत पदे | 72 |
| रिक्त पदे | 27 |

# जिल्हा वार्षिक सर्वसधरण योजना

## 1. वैरण विकास योजना. :-

या योजनेतंर्गत पशुसंवर्धन खात्याच्या मार्गदर्शन सुचना व निकषानुसार पशुपालकांच्या गायी /म्हशींच्या दुग्धोत्पादनात वाढ होण्याच्या दृष्टीने हिरव्या चारा उपलब्ध करून देणे साठी प्रति लाभार्थी रू.4000/- मर्यादेत वैरण बियाणांची व ठोंबांची खरेदी करण्यात येवून तालुकास्तरावरून तालुक्यातील पशुवैद्यकिय संस्थामार्फत पशुपालकांपर्यंत पोहच करून चाऱ्याचे उत्पादन करून योजना राबविण्यात येते.

## 2. कामधेनू दत्तक ग्राम योजना –

कामधेनू दत्तक ग्राम योजना. -1,52,500/- गावनिहाय खर्च करण्यात येतात.

**सदर योजनेतंर्गत निवड झालेल्या गावांमध्ये खालील प्रमाणे टप्पेनिहाय योजना राविण्यात येते.**

१. अद्यावत पशुगणना , विशेष ग्राम सभेचे आयोजन करून योजनेचे वेळापत्रक अवगत करून देण्यात येते.
२. जंतनिर्मुलन शिबीरांचे आयोजन करण्यात येते
३. गोचीड - गोमाशा निर्मुलन बाबत पशुपालकांना प्रबोधन करून त्या गावांतील गोठे व जनावरांच्या अंगावर औषधांची फवारणी करण्यात येते.व गोचीड निर्मुलन करण्यात येते तसेच दत्तक गावातील सर्व जनावरांना जंताचे औषध देवून 100 % जनावरांच्या जंतनिमुर्लन करण्यात येते.
४. संसर्गजन्य रोगप्रतिबंधक लसिकरण कार्यक्रम मोहिम स्वरूपात घेण्यात येते.
५. वंधत्व निवारण शिबीरांचे आयोजन करणे औषधोपचार व लसिकरण 100% करण्याचे प्रयत्न करण्यात येते.
६. निकृष्ट वैरणीवर गुळ, मीठ, युरीया फवारणी प्रात्याक्षिक दाखविण्यात येतात.
७. दुग्धस्पर्धेचे आयोजन करण्यात येते
८. पशुपालकांची पशुसंवर्धन विषयक माहितीसाठी सहल काढण्यात येते.
९. पाठपुरावा व वंधत्व निवारण शिबीरांचे आयोजन करणे.
१०. दुधाळ जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी सुधारीत जातीचे ठोंबे व बियाणे सदर गावामध्ये वाटप केले जाते.
११. सदर योजनेच्या प्रसिध्दी व प्रचारासाठी साठी विविध योजनेचे फलेक्स बोर्ड, बॅनर,फोटोग्राफी,मंडप स्पिकर,घडी पत्रके इ. वापर करण्यात येतो.
१२. नावीन्यपूर्ण कार्यक्रमांतर्गत अझोला लागवडीचे व स्वच्छ दूध निर्मितीचे प्रात्याक्षिके घेण्यात येतात.

## 3. पशुवैद्यकीय संस्थांना औषध पुरवठा करणे :-

सदर योजनेतंर्गत पशुसंवर्धन खात्याच्या मार्गदर्शन सुचना व निकष/ भावबंद करारा नुसार व क्षेत्रिय मागणीनुसार पशुवैद्यकिय दवाखाना श्रे-1 साठी रू.2.00 लक्ष व पशुवैद्यकिय दवाखाना श्रे-2 साठी रू. 1.00 लक्ष याप्रमाणे औषधे खरेदी करण्यात येवून जिल्हयातील बिगर आदिवासी क्षेत्रातील 142 पशुवैद्यकिय संस्थांना वाटप करण्यात येते.

# आदिवासी उपयोजना (TSP) :-

## 1.आदिवासी उपयोजना अंतर्गत शेळीगट वाटप :-

| अ. क्र | योजनेचे नाव | उद्देश व स्वरूप | लाभार्थी निवड व अटी | आवश्यक कागदपत्रे | खर्च व अनुदान | निवड प्रक्रिया/खरेदी प्रक्रिया |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आदिवासी उपयोजना अंतर्गत शेळीगट वाटप | अनु.जमाती लाभार्थींना 75 % अनुदानावर संगमनेरी / उस्मानाबादी शेळीगट (10 शेळया आणि 1 बोकड पुरवठा करणे) | अनु.जमाती - 30 % महिला<br>- 3 % विकलांग यांना प्राधान्य. | फोटो ओळखपत्र<br>ग्राम सभेची शिफारस.<br>- जातीचा दाखला.<br>- 7/12 दाखला<br>-8 अ दाखला<br>100 रू.बॉण्ड संमतीपत्र<br>- ग्रा.पं.नमुना नं. -8<br>तिसरे अपत्य दाखला<br>- रहिवासी दाखला | एकुण किंमत 90000/-+विमा - 13545/- एकुण 103545/-<br>25 % लाभार्थी हिस्सा 25886/- रोख भरणे अनुदान 75 % 77659/- | तालुकास्तरावरून परिपुर्ण अर्ज मागवून , जिल्हास्तरावर त्यांची छाणनी करून मा. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,यांच्या अध्यक्षतेखालील निवड समिती . मार्फत पात्र लाभार्थ्यांची निवड केली जाते. व तालुकासस्तरावरील खरेदी समिती मार्फत महामंडळाकडून लाभार्थ्यास शेळीगट खरेदी करून देण्यात येतो. |

## 2. पशुवैद्यकीय संस्थांना जीवरक्षक औषध पुरवठा करणे तसेच शेळया/मेंढयांना जंतनाशक औषध पुरविणे

सदर योजनेतंर्गत पशुसंवर्धन खात्याच्या मार्गदर्शन सुचना व निकष/ भावबंद करारा नुसार व क्षेत्रिय मागणीनुसार पशुवैद्यकिय दवाखाना श्रे-1 साठी रू.2.00 लक्ष व पशुवैद्यकिय दवाखाना श्रे-2 साठी रू. 1.00 लक्ष याप्रमाणे औषधे खरेदी करण्यात येवून जिल्हयातील आदिवासी क्षेत्रातील 102 पशुवैद्यकिय संस्थाकरीता औषधी खरेदी करुन वाटप करण्यात येते.

## 3.आदिवासी उपयोजनेंतर्गत वैरण विकास योजना :-

सदर योजनेतंर्गत पशुसंवर्धन खात्याच्या मार्गदर्शन सुचना व निकषानुसार पशुपालकांच्या गायी /म्हशींच्या दुग्धोत्पादनात वाढ होण्याच्या दृष्टीने हिरव्या चाऱ्याची उपलब्ध करून देणे साठी वैरण बियाणांची व ठोबांची खरेदी करण्यात येवून तालुकास्तरावरून तालुक्यातील पशुवैद्यकिय संस्थामार्फत पशुपालकांपर्यंत पोहच करून चाऱ्याचे उत्पादन वाढविण्यासाठी लाभार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात येते.

### 4.आदिवासी उपयोजना अंतर्गत पशुवैद्यकिय दवाखाना/ पशुप्रथमोपचार केंद्राचे बांधकाम करणे.

सदर योजनेतंर्गत पशुसंवर्धन खात्याच्या मार्गदर्शन सुचना व निकषानुसार पशुपालकांच्या आदिवासी क्षेत्रातील पशुवैद्यकिय दवाखान्यांचे नविन बांधकाम करण्यात येते व संरक्षक भिंत बांधकाम करण्यात येते.

### 5.आदिवासी उपयोजना अंतर्गत दुभत्या जनावरांना खाद्य पुरवठा करणे.

सदर योजनेतंर्गत पशुसंवर्धन खात्याच्या मार्गदर्शन सुचना व निकषानुसार पशुपालकांच्या भाकड गायी /म्हशींच्या दुग्धोत्पादनात वाढ होण्याच्या दृष्टीने 150 किग्रॅ तसेच गाभण जनावरांना 225 किग्रॅ पशुखाद्य विकत घेण्यासाठी बाजारभावाप्रमाणे अनुदान DBT व्दारे पशुपालकांच्या खात्यात वर्ग करण्यात येते. जेणे करून दुधउत्पादन वाढविण्यासाठी लाभार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात येते.

### 6 .आदिवासी उपयोजना अंतर्गत पशुवंधत्व निवारण शिबीराचे आयोजन करणे.

सदर योजनेतंर्गत पशुसंवर्धन खात्याच्या मार्गदर्शन सुचना व निकषानुसार प्रति जनावरांना रू.1000/- या प्रमाणे वंधत्व निवारणासाठी औषधे खरेदी करण्यात येवून पशुवैद्यकिय संस्थांना वाटप करण्यात येईल.

## आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना (OTSP) :-

### १. पशुवैद्यकीय संस्थांना औषध पुरवठा करणे तसेच शेळया/मेंढयांना जंतनाशक औषध पुरविणे

सदर योजनेतंर्गत पशुसंवर्धन खात्याच्या मार्गदर्शन सुचना, निकषानुसार व भावबंद करारा नुसार जिल्हयातील पशुपालकांच्या जनावरांना औषधे खरेदी करण्यात येवून तालुकास्तरावरून पशुवैद्यकिय संस्थाना पुरवठा करून योजना राबविण्यात येते. जिल्हयातील आदिवासी क्षेत्राबाहेरील पशुवैद्यकिय संस्थाकरीता औषधी खरेदी करुन वाटप करण्यात येते.

### 2 .आदिवासी उपयोजना अंतर्गत पशुवंधत्व निवारण शिबीराचे आयोजन करणे. :- मंजूर नियतव्यय - रू.3.00 लक्ष.

सदर योजनेतंर्गत पशुसंवर्धन खात्याच्या मार्गदर्शन सुचना व निकषानुसार प्रति जनावरांना रू. 1000/- या प्रमाणे वंधत्व निवारणासाठी औषधे खरेदी करण्यात येवून पशुवैद्यकिय संस्थांना वाटप करण्यात येईल.

# विशेष घटक योजना :-

| अ क्र. | योजनेचे नाव | उद्देश व स्वरूप | लाभार्थी निवड व अटी | खर्च व अनुदान | निवड प्रक्रिया |
|---|---|---|---|---|---|
| 1 | विशेष घटक योजना अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण | अनु.जाती / नावबौध्द लाभार्थींना 3 दिवस पशुसंवर्धन प्रशिक्षण देणे. | अनु.जाती / नवबौध्द लाभार्थी<br>- 30 % महिला<br>- 3 % विकलांग यांना प्राधान्य. | रू.1000/- प्रति लाभार्थी<br>- चहा / नाष्टा जेवण -300<br>प्रवासभाडे - 100/-<br>छापील माहिती इ.-100/-<br>दृकश्राव्य,प्रचार, बॅनर्स,चार्टस -500/-<br>एकुण - 1000/- | तालुकास्तरावरुन प्रस्ताव मागणी चालु आहे. प्रस्ताव प्राप्त झल्यानंतर जिल्हा निवड समिती मार्फत लाभार्थीची निवड करण्यात येउन लाभार्थीना पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षणचा लाभ् देण्यात येइल. |
| 2 | विशेष घटक योजना अंतर्गत शेळीगट वाटप | अनु.जमाती लाभार्थींना 75 % अनुदानावर संगमनेरी / उस्मानाबादी शेळीगट (10 + 1 ) | अनु.जातीचा लाभार्थी असावा.<br>- 30 % महिला<br>- 3 % विकलांग यांना प्राधान्य. | एकुण किंमत 90000/-+विमा -13545/-<br>एकुण 103545/-<br>25 % लाभार्थी हिस्सा 25886/- रोख भरणे<br>अनुदान 75 % 77659/- | तालुकास्तरावरून परिपुर्ण अर्ज मागवून, जिल्हास्तरावर त्यांची छाणणी करून मा. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,यांच्या अध्यक्षतेखालील निवड समिती, मार्फत पात्र लाभार्थ्यांची निवड केली जाते. व तालुकासस्तरावरील खरेदी समिती मार्फत महामंडळाकडून लाभार्थ्यास शेळीगट खरेदी करून देण्यात येतो. |
| 3 | दुभत्या जनावरांना खाद्य पुरवठा करणे | दुभत्या/ भाकड गायी म्हशी करीता पोषण आहार देण्याकरीता गायींकरीता 150 कि.ग्रॅ.व म्हशींकरीता 225 कि.ग्रॅ. पशुखाद्य वाटप. | अनु.जातीचा लाभार्थी असावा.<br>- 30 % महिला<br>- 3 % विकलांग यांना प्राधान्य. | पशुखाद्याचे बाजारभावानुसार अंदाजे रू.23/- प्रति किलो या दराने गायी करीता 150 किलो पशुखाद्य या प्रमाणे 3450/- प्रति लाभार्थी अनुदान DBT व्दारे वर्ग करण्यात येईल. | जिल्हास्तरीय निवड समिती मार्फत पात्र लाभार्थ्यांची निवड करून , निवड झालेल्या लाभार्थ्यांची यादी तालुकास्तरावर पाठवण्यात येईल. त्याअनुषंगाने लागणारे अनुदान तालुकास्तरावर वर्ग करण्यात येईल. |
| 4 | अनुसुचित जातीच्या कुटुंबाच्या जनावरांना जंतुनाशक पुरविणे | जनावरांचे आरोग्य व रोगप्रतिकार शक्ती वाढण्याकरीता जंतुनाशक औषधांचा पुरवठा करणे. | पशुवैद्यकिय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व अनु. जातीच्या लाभार्थींना लाभ देण्यात येईल. | भावबंद दरकरारातून जंतनाशक औषधे खरेदी करून पवैद दवाखान्यांना पुरवठा करण्यात येणार आहे. | - |